








# ज्ञान प्रबोधिनी नेतृत्व संवर्धन केंद्र

## प्रशासकीय नेतृत्वाच्या पायाभरणीसाठी...

# लीडरशीप फाउंडेशन व प्रिपरेटरी कोर्स

(१२ वी ते पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी)


## २०२३ चे माहितीपत्रक

समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व संवर्धन










**यशस्वी वाटचालीला सुरुवात...**

**आपला दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या**
**५ विद्यार्थ्यांची २०२० UPSC मध्ये निवड**
**मृणाली जोशी महाराष्ट्रात पहिली** (AIR 36)

- सुमारे ३०० विद्यार्थी स्पर्धा परीक्षांची तयारी करीत आहेत.
- सुमारे १५० जण विविध क्षेत्रांत कर्तृत्व फुलवत आहेत.

**आजच नोंदणी करा...**
एकच तुकडी...मर्यादित प्रवेश!

# या कोर्समध्ये का सहभागी व्हावे?

**आजच्या देशस्थितीबद्दल अस्वस्थता आहे का?**
**या परिस्थितीमध्ये बदल घडवून आणण्याची इच्छा आहे का?**
**त्यासाठी स्पर्धा परीक्षा देऊन, प्रशासकीय अधिकारी होऊन, उत्तम Perform करायचे आहे का?**
**सामाजिक क्षेत्रात पुढाकार घेऊन, गटउभारणी करून, विकासातील अडथळे, अन्याय, विषमता दूर करू इच्छिता का?**

तर मग महाविद्यालयीन शिक्षण घेता-घेता मनातल्या या ऊर्मीला **नियोजनबद्ध पूर्वतयारी व अनुभवाधारित पायाभरणीची जोड द्यायलाच हवी. यासाठी ज्ञान प्रबोधिनीचे नेतृत्व संवर्धन केंद्र ही योग्य निवड ठरेल!**

नेतृत्व संवर्धनाच्या क्षेत्रातला ज्ञान प्रबोधिनीचा प्रदीर्घ अनुभव आणि राष्ट्रीय व राज्यस्तरावरील एक हजारांहून अधिक प्रशासकीय अधिकारी घडविणाऱ्या ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्राची यशस्वी वाटचाल यांच्या संयोगातून २०१४ साली **'लीडरशीप फाऊंडेशन व प्रिपरेटरी कोर्स'** ला प्रारंभ झाला.

समृद्ध, समर्थ अन् विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी खरी गरज आहे ती विविध क्षेत्रांमध्ये कार्यक्षम, चारित्र्यसंपन्न आणि समाजाभिमुख नेतृत्वाची! अशा नेतृत्वाला धुमारे फुटतात ते महाविद्यालयीन आणि पदव्युत्तर वयात! या धुमाऱ्यांना योग्य दिशा मिळावी, आवश्यक असे प्रशिक्षण मिळावे, कर्तृत्ववान व्यक्तींचा सहवास लाभावा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभावे आणि प्रत्यक्ष कामाची - अनुभवांची संधी मिळावी यासाठी २०१८ मध्ये **'लीडरशीप फाऊंडेशन कोर्स'** सुरू झाला.

या दोन्हीपैकी कोणत्याही कोर्समध्ये सहभागी होऊन, मोठमोठी स्वप्ने पाहायला आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी स्वत:ला सक्षम करायला शिकू या. **'Know, Explore & Enrich - Self,** व **'Know & Explore Society & Systems to Enrich it'** यावर आधारित हा अभ्यासक्रम तुम्हाला निश्चितच समृद्ध करेल.

नेतृत्वाची क्षमता असताना निव्वळ मार्क-पदवी-नोकरीच्या आंधळ्या शर्यतीत का धावताय? प्रशासकीय क्षेत्रात अथवा अन्य कोणत्याही क्षेत्रात **अर्थपूर्ण करिअर करण्याची व नेतृत्व करण्याची इच्छा असलेल्या सर्वच युवक-युवतींनी या कोर्सेसमध्ये आवर्जून सहभागी व्हावे.**

# संस्थात्मक पार्श्वभूमी

* **ज्ञान प्रबोधिनी –** 'रूप पालटू देशाचे' असं स्वप्न उराशी बाळगून स्वामी विवेकानंदांच्या तत्त्वविचाराला मूर्तरूप देणारी संस्था-संघटना म्हणून (१९६२ मध्ये) ६१ वर्षांपूर्वी ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याला प्रारंभ झाला. शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन, आरोग्य, नेतृत्व संवर्धन, स्त्रीशक्ती प्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक उद्योजकता या विविध कार्यक्षेत्रांमध्ये ज्ञान प्रबोधिनीचे काम विस्तारलेले आहे.
* **ज्ञान प्रबोधिनी स्पर्धात्मक क्षमता संवर्धन केंद्र –** १९९५ साली सुरू झालेल्या या केंद्रातून आजपर्यंत सुमारे ७५० अधिकारी राज्य सेवेत तर ५७५ अधिकारी केंद्रीय लोकसेवेत कार्यरत आहेत. वैशिष्ट्यपूर्ण शिक्षणप्रणाली, सामाजिक जाणीवा विकसित करणारे अनुभव, स्व-ओळख व विकासाला पोषक सत्रे, वैयक्तिक समुपदेशन व मार्गदर्शन आणि यशस्वी अधिकाऱ्यांचे अनुभवकथन ही या केंद्राची वैशिष्ट्ये.
* **नेतृत्व संवर्धन केंद्र –** 'समाज परिवर्तनासाठी नेतृत्व संवर्धन' असे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन ज्ञान प्रबोधिनीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात, २०१२ साली या केंद्राला प्रारंभ झाला. विविध क्षेत्रांमध्ये, १८ ते ३५ वयोगटातील युवक-युवतींमधील नेतृत्व संवर्धन करण्यासाठी विविध अभ्यासक्रम, प्रशिक्षणवर्ग, कार्यशाळा, व्याख्याने यांचे आयोजन करण्यावर या केंद्राचा भर आहे. आजपर्यंत नियमित प्रशिक्षण वर्गांमध्ये ८०० पेक्षा अधिक आणि प्रासंगिक कार्यशाळा, व्याख्याने यांमध्ये सात हजारांहून अधिक युवक-युवती सहभागी झाले आहेत. या केंद्रातील पाच विद्यार्थी - UPSC मध्ये निवडले गेले आहेत व सुमारे ३००जण सध्या अभ्यास करत आहेत.
  - **केंद्राचे ध्येयवाक्य (Vision Statement) – 'समाज परिवर्तनासाठी नेतृत्व संवर्धन'**
  - **केंद्राचे कार्यविधान (Mission Statement) –** प्रशासकीय व व्यवस्थापन क्षेत्र, सामाजिक क्षेत्र आणि संघटन व मनुष्यघडणीचे क्षेत्र या तीन क्षेत्रांमधे लागणारी नेतृत्व कौशल्ये, गुण, वृत्ती व प्रेरणा यांच्या पायाभरणीसाठी व विकासासाठी १८ ते ३५ वयोगटातील युवक युवतींच्या प्रशिक्षणाचे व अनुभवशिक्षणाचे नियमित व प्रासंगिक कार्यक्रम राबविणे व त्यातून नेतृत्व गुण विकसनाची शिक्षण प्रणाली विकसित करणे.

# लीडरशीप फाउंडेशन व प्रिपरेटरी बेसिक कोर्स

## सर्वसाधारण माहिती व अपेक्षा

- **कोर्स कोणासाठी?** – समाजाभिमुख, कार्यक्षम व चारित्र्यसंपन्न नेतृत्व करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी होऊ इच्छिणारे, **कोणत्याही विद्याशाखेत पदवीपूर्व शिक्षण** घेत असेलेले विद्यार्थी (undergraduate students) या कोर्समध्ये प्रवेश घेऊ शकतात.
- **कोर्सचे स्वरूप** – हा कोर्स २ वर्षांचा असून त्यामध्ये १-१ वर्षांचे २ अभ्यासक्रम बेसिक (जिज्ञासा) व ॲडव्हान्स (आकांक्षा) या नावाने चालतात. बेसिक कोर्स केलेल्या विद्यार्थ्यांनाच ॲडव्हान्सच्या वर्गामध्ये प्रवेश मिळतो.
- **कोर्सचे तपशील** –

  **कालावधी – जुलै २०२३ ते मार्च २०२४ (बेसिक) व जून २०२४ ते मार्च २०२५ (ॲडव्हान्स)**

  **वेळ** – सोमवार ते शुक्रवार सायं. ६ ते रा.८, शनिवारी दु. ४ ते रा. ७.३०

  **विद्यार्थी संख्या** – ६० विद्यार्थ्यांना प्रवेश. (वैयक्तिक माहिती, गृहपाठ व मुलाखतीच्या आधारे निवड.)
- **Faculty/प्रशिक्षक** – UPSC ची मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेले/पद मिळवलेले विद्यार्थी-अध्यापक प्रिपरेटरीचा अभ्यासक्रम शिकवतात, तर अभ्यासकौशल्ये, व्यक्तिमत्त्व व नेतृत्व विकसनातील विविध विषय तज्ज्ञ व्यक्ती शिकवतात. वैयक्तिक व गटश: Mentoring/मार्गदर्शन तज्ज्ञ व्यक्तींद्वारा उपलब्ध.
- **वर्गांचे माध्यम** – प्रिपरेटरीची सत्रे प्रामुख्याने इंग्रजीमधून घेतली जातात. गटाच्या आवश्यकतेनुसार गरजेपुरता मराठीचा वापर केला जातो. फाऊंडेशनचे सर्व कार्यक्रम प्रामुख्याने मराठी भाषेतून होतात. गटाच्या गरजेनुसार इंग्रजीचा वापर केला जातो.
- **Study Material-Notes बाबत** – विद्यार्थ्यांनी स्वयंअध्ययन कौशल्यांचा वापर करून स्वत:ची टिपणे काढावीत, यावर भर असतो. आवश्यकतेनुसार मर्यादित स्वरूपात टिपणे दिली जातात.
- **अभ्यासिका** – विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी सकाळी ७ ते रात्री १० या वेळात अभ्यासिकेची सोय उपलब्ध आहे. मर्यादित जागा उपलब्ध. त्याचे स्वतंत्र शुल्क भरावे लागेल.
- **वर्गाचे नियोजन** – वर्षाच्या सुरुवातीला वार्षिक आराखडा व सत्राचे नियोजन दिले जाते. यामध्ये कोणत्या महिन्यात कोणते विषय शिकविले जाणार व कोणते कार्यक्रम व मूल्यमापन होणार याची माहिती दिली जाते. दर शनिवारी पुढील आठवड्यातील तासांचे विषय व प्रकरणांनुसार वेळापत्रक दिले जाते.
- **पथक योजना** – सर्व विद्यार्थी विविध गटांमध्ये (पथकांमध्ये) विभागले जातात. त्यांना नियमित व प्रासंगिक कामांच्या जबाबदाऱ्या दिल्या जातात. त्या त्यांनी पथकाने मिळून करावयाच्या असतात. ही कामे करता करता विद्यार्थ्यांनी व्यावहारिक ज्ञान वाढविण्याचा, नियोजन व कार्यवाही कौशल्यांचा सराव करण्याचा, गटात काम करण्याचा व नेतृत्व करण्याचा अनुभव घ्यावा व त्यादृष्टीने सर्व विद्यार्थ्यांनी मनापासून सहभागी व्हावे ही अपेक्षा असते. प्रत्येक पथक आपले पथकप्रमुख निवडतात. दर दीड महिन्यांनी पथकप्रमुख बदलतात. पथकप्रमुखांची साप्ताहिक बैठक होते. त्यात कामांचा आढावा, त्यातून होणारे शिक्षण व नेतृत्वाच्या विविध पैलूंवर चर्चा व मार्गदर्शन होते.
- **प्रार्थना व उपासना** – वर्गाची सुरुवात व शेवट सामूहिक प्रार्थनेने होतो तर आठवड्यातून एकदा दर शनिवारी उपासना होते. स्वयं-विकासासाठी, स्वत:च्या आयुष्यातले ध्येय ठरविण्यासाठी या सर्वांचा डोळसपणे कसा वापर करायचा याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते.
- **मूल्यमापन व प्रमाणपत्र** – वर्षभरात फाउंडेशन व प्रिपरेटरी या दोन्ही भागांचे मिळून विविध परीक्षा, Assignments, presentations, प्रकल्प, विविध उपक्रमांमधला सहभाग, उपस्थिती इ. च्या आधारे १००० गुणांचे मूल्यमापन केले जाते. त्यामध्ये प्रत्येक विभागात प्रत्येकी ४०% पेक्षा अधिक व एकूण मिळून ५०% पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्यांना प्रमाणपत्र दिले जाते व विशेष गुणवत्ता मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसेही दिली जातात.
- **नियमित अभ्यासाचा आग्रह** – रोजच्या तासांव्यतिरिक्त विद्यार्थ्यांनी रोज सरासरी ३ ते ४ तास UPSC द्वारा होणाऱ्या स्पर्धा परीक्षेसाठीचा स्वत:चा अभ्यास नियमितपणे करणे अपेक्षित आहे. वर्गात येण्यापूर्वी त्या त्या प्रकरणाचे पूर्ववाचन करून व प्रश्न काढून विद्यार्थ्यांनी बसावे व लक्षपूर्वक विषय समजून घ्यावा, तरच वर्गात शिकविलेले समजू शकेल. दिलेले गृहपाठ, Assignments, Presentations, NCERT व अन्य संदर्भ पुस्तकांचे, तसेच वृत्तपत्रे व नियतकालिके यांचे नियमित वाचन, टिपणे काढणे, मासिक परीक्षांचा अभ्यास इ. गोष्टी वेळच्यावेळी करणे अपेक्षित आहे, त्यातूनच स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी योग्य गतीने होऊ शकेल.
- **उपस्थिती व शिस्त** – विद्यार्थ्यांची किमान ८०% उपस्थिती आवश्यक आहे. सलग ५ दिवसांपेक्षा अधिक काळ अनुपस्थित राहण्यासाठी वर्ग समन्वयकाकडून लेखी परवानगी घेणे अनिवार्य आहे. शिक्षणाला पूरक असेच वर्गाचे वातावरण राहील यासाठी विद्यार्थ्यांनी मूलभूत शिस्तीचे स्वयंस्फूर्तीने पालन करणे अपेक्षित आहे.

**संपर्क – ज्ञान प्रबोधिनी, नेतृत्व संवर्धन केंद्र, ५१०, सदाशिव पेठ, पुणे –** 411 030,
**फोन – ०२०-२४२०७१७९, E-mail - leadershipfc@jnanaprabodhini.org**

# लीडरशीप फाऊंडेशन व प्रिपरेटरी कोर्स - २ वर्षांचा अभ्यासक्रम

## Foundation

### Personality Development

- Physical Development
- Mental Development
- Intellectual Development
- Emotional Development
- Social Development
- Spiritual Development
- Challaneges of Youth
- Meaningful Career & Life Goals
- Knowing & Exploring Self
- Stress Management
- Time Management

### Leadership Awareness and Skills Development

- Goal Setting & Vision Building
- Planning & Execution
- Effective Communication
  (Public Speaking, Debate, Meeting Management, Group Discussion, Interviewing)
- Problem Solving
- Decision Making
- Team Work & Team Building
- Leadership Functions, Roles & Styles
- Self Motivation & Motivating Others
- Creative Thinking
- Critical Thinking

### Nurturing Leadership Qualities

- Taking Initiative
- Facing Unexpected Situations
- Being Responsible & Responsive
- Confidence Building
- Stretching the abilities
- High Energy Level & Enthusiasm
- Reflective Thinking & Metacognition

### Exploring the System & Society

- Knowing different Government Systems operating at Local, Block & District Level
- Understanding the contribution of various Factors and Stake holders in the development of Village, Block & District
- Exploring the dynamics involved in various sections of the Society
- Discussing various developmental issues
- Special Lectures & Interactions with Govt. Officers & Social Leaders

## Preparatory

### GS/CSAT

- Polity, History, Geography
- Science & Tech., Economics, Environment
- Ethics, Current Issues
- GMAT, BNDI, LRAA, Comprehension
- Essay Writting

### UPSC Orientation

- Exam Pattern, Syllabus and PYQs
- Various Services & Work Profiles
- Overall Planning For Preperation
- Books, References and E-References
- Prelim and Mains Study Strategy
- Selection of Optional
- Writing Mains - Presentation Skills
- MCQ Approach to Study
- Personality Test

### Study Skills

- Study Steps, Methods & Good Habits
- Perspective Building & Interdisciplinary Approach
- Reading Faster and Better
- Active Listening & Smart Questioning
- In-Depth Comprehension
- Precise Writing
- Time and Resource Planning
- Information Gathering & Organising
- Information Processing
  (Charts, Notes taking & making, Mind Maps)
- Effective techniques of E-Surfing
- Memory and Revision Techniques
- Presentation & Seminar
- Effective Group Study Methods

### Current Events

- How to read Newspaper & Periodicals
- Importance & Relevance of a news
- Smart Questioning
- Organising Relevant Data & Information
- Relating Syllabus to Current Events
- Analysis & Interpretation
- Developing Perspective
- Group Discussion & News Circle

# कोर्सचे स्वरूप

**लीडरशीप फाऊंडेशन** व **प्रिपरेटरी** अशा दोन भागांमध्ये अभ्यासक्रम विभागलेला असून दोन्ही भाग तितकेच महत्त्वाचे आहेत व प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी दोन्ही भाग पूर्ण करणे आवश्यक आहे.

## १) लीडरशीप फाऊंडेशन

आत्मविश्वास वाढविणाऱ्या व नेतृत्वाची पायाभरणी करणाऱ्या खालील सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होणे अपेक्षित आहे. प्रत्येक वर्गामध्ये वर्षभरात १५ दिवस निवासी उपक्रम होतील.

| तपशील | **Basic** (जिज्ञासा) | **Advance**(आकांक्षा) |
|---|---|---|
| **१. निवासी उपक्रम**<br>(दीड ते साडेतीन दिवसांचे) | - गिरिभ्रमण रात्रसहल<br>- सायकल सहल (सुमारे १२५ कि.मी.)<br>- तंबूमधील साहस शिबिर<br>- ग्रामीण परिचय शिबिर<br>- नेतृत्व संवर्धन शिबिरे (दोन) | - तालुका अभ्यास सहल<br>- जिल्हा अभ्यास सहल<br>- नेतृत्व संवर्धन शिबिर<br>- वैचारिक अभ्यास शिबिर<br>- गिरिभ्रमण सहल |
| **२. अनिवासी उपक्रम** | - गटकार्ये/जोडीकार्ये<br>- समाजभान प्रकल्प | - व्यक्ति/जोडी/गटकार्ये<br>- समाज योगदान प्रकल्प |
| **३. व्यक्तिमत्त्व विकसन सत्रे** | - १० सत्रे | - १० सत्रे |
| **४. नेतृत्व व विचार कौशल्ये सराव** | - ६ सत्रे | - ६ सत्रे |
| **५. पथकप्रमुख बैठक** | - आठवड्यातून एकदा मार्गदर्शनपर बैठक<br>(वर्षभरात ५०% विद्यार्थ्यांना पथकप्रमुख होण्याची संधी!) | |
| **६. ऐच्छिक उपक्रम** | **नेतृत्व अनुभवण्याच्या, समृद्ध करण्याच्या, अभिव्यक्त करण्याच्या अनेक संधी !**<br>- आपापल्या महाविद्यालयांमध्ये संकल्प व्याख्यानमालेचे आयोजन.<br>- ग्रेट भेट मुलाखत स्पर्धा, मेळावे, कार्यशाळा यांचे आयोजन.<br>- युवोन्मेष या नियतकालिकात लेखन, संपादन, वितरण, अर्थ उभारणी इ. मध्ये सहभाग.<br>- सुट्ट्यांमध्ये महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यांमध्ये ४ ते ८ दिवसांच्या अनुभवसमृद्ध करणाऱ्या अभ्यास सहली.<br>- ज्ञान प्रबोधिनीतील ज्ञानसेतू, युवोन्मेष, नागरवस्ती प्रकल्प, दुष्काळ निवारण कार्य, ग्रामविकसन, छात्र प्रबोधन, युवक-युवती कार्य इ. विभागांच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची, जबाबदारी घेण्याची संधी.<br>- २ ते ३ महिने मिळून १०० तास कार्यानुभव व अर्थार्जनाची संधी! | |


नेतृत्व संवर्धन शिबिर


साहस शिबिर

# २) प्रिपरेटरी

प्रशासकीय सेवेसाठीच्या स्पर्धा परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी हा अभ्यासक्रम तयार करण्यात आलेला आहे. GS व CSAT सत्रे दोन तासांची व अन्य सत्रे एक तासांची असतील.

| तपशील | Basic (जिज्ञासा) | Advance (आकांक्षा) |
|---|---|---|
| १. GS व CSAT | सर्व विषयांचा मिळून १२० सत्रे | बेसिक मधील विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी सर्व विषयांची मिळून एकूण १२० सत्रे |
| २. सद्य घडामोडींचा अभ्यास | साप्ताहिक एक तास | साप्ताहिक एक तास |
| ३. UPSC Orientation | १० सत्रे | ८ सत्रे |
| ४. अभ्यास कौशल्ये, सवयी, तंत्रे | २० सत्रे | १० सत्रे |
| ५. प्रशासकीय कार्यालये व अधिकारी भेटी | प्रत्येक वर्षी २ प्रशासकीय कार्यालयांना भेटी व ४ प्रशासकीय अधिकाऱ्यांची अनुभवकथने | |
| ६. मूल्यमापन | – दर पंधरा दिवसांनी लेखी परीक्षा, उत्तरपत्रिकांचे विश्लेषण व चर्चा | |
| | – प्रत्येकाने वर्षातून २ वेळा विषयातील छोटे प्रकरण १० मिनिटांच्या Presentation द्वारा वर्गातील सर्वांना समजावून सांगणे<br>– प्रत्येक विषयाच्या अभ्यासाला पुढावा देणाऱ्या Assignments<br>– कोर्सच्या शेवटी UPSC Prelim प्रमाणे GS व CSAT या विषयांची परीक्षा<br>– सद्य घडामोडीसंदर्भात प्रकल्प | |







## प्रवेश प्रक्रिया

* वर्गाला प्रवेश घेण्यासाठी शेजारील QR Code स्कॅन करून चौकशीचा अर्ज व नोंदणी शुल्क रू. १००/- भरावे. शुल्क भरण्यासाठीचे तपशीलही शेजारील QR Code स्कॅन केल्यास मिळतील.
* अर्ज भरल्यानंतर तुम्हाला Whatsapp गटात सामील होण्यासाठी लिंक मिळेल. त्यात तुम्ही सहभागी व्हावे. तेथे तुम्हाला प्रवेश प्रक्रियेचे पुढील तपशील मिळतील.

**पुढील ३ गोष्टींच्या आधारे मूल्यमापन व निवड केली जाईल.**

१. तुम्हाला २ व्हिडिओच्या लिंक्स पाठवल्या जातील ते बघून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवायची आहेत.

२. स्वत:ची ओळख करून देणारी काही माहिती तुम्ही गुगलफॉर्म द्वारे प्रामाणिकपणे भरून पाठवायची आहे.

३. झूम माध्यमाद्वारे ऑनलाइन स्वरूपात किंवा प्रत्यक्ष १५-२० मिनिटांची मुलाखत घेतली जाईल.

त्या त्या आठवड्यात गुरुवारपर्यंत वरील पहिली दोन कामे पूर्ण करणाऱ्यांच्या मुलाखती त्या आठवड्यात शनिवारी घेतल्या जातील, त्याच्या वेळा त्यांना शुक्रवारी कळवल्या जातील. पुढील आठवड्यातील मंगळवारी त्याचा निर्णय जाहीर केला जाईल. शनिवार दि. २२ एप्रिल पासून वर्गाच्या मुलाखती सुरू होतील.

अपेक्षित संख्या पूर्ण झाल्यास प्रवेश प्रक्रिया थांबवली जाईल. त्यामुळे लवकरात लवकर प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.

* वरील मूल्यमापनाच्या आधारे अंतिम निर्णय जाहीर केला जाईल. **निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी फी भरून प्रवेश निश्चित करावा** व **प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना** २० जून नंतर उपलब्धतेनुसार गुणानुक्रमे प्रवेश दिला जाईल. **निवड न झालेल्या विद्यार्थ्यांनी** यावर्षी पुन्हा प्रवेश प्रक्रियेत सहभागी होऊ नये.

वरील प्रक्रियेत कुठल्याही स्वरूपाची अडचण आल्यास केंद्राच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष येऊन अथवा ०२०- २४२०७१७९ या क्रमांकावर संपर्क करावा.

## शुल्क **जिज्ञासा वर्गाचे वार्षिक शुल्क – रु. ६५,०००/– (GST सह)**

**शुल्क भरण्याच्या सवलतींचे तपशील**

| शुल्क भरण्याचे तपशील | पर्याय १ | पर्याय २ | पर्याय ३ | पर्याय ४ |
|---|---|---|---|---|
| प्रवेशासाठी निवड यादी जाहीर केल्यापासून ८ दिवसांत | २५,०००/- | - | - | - |
| २५ जून २०२३ पर्यंत | ३०,०००/- | ५८,०००/- | ३०,०००/- | ३०,०००/- |
| ३१ ऑगस्ट २०२३ पर्यंत | - | - | ३०,०००/- | २०,०००/- |
| १५ ऑक्टोबर २०२३ पर्यंत | - | - | - | १५,०००/- |
| **एकूण शुल्क** | ५५,०००/- | ५८,०००/- | ६०,०००/- | ६५,०००/- |
| **एकूण शुल्कातील सवलत** | १०,०००/- | ७,०००/- | ५,०००/- | - |

• **शुल्कात सवलत –** आर्थिकदृष्ट्या वंचित गटातल्या ३ ते ५ विद्यार्थ्यांना शुल्कामध्ये १०% ते ४०% सवलत दिली जाईल. गरजू विद्यार्थ्यांनी सवलत मिळवण्यासाठी प्रवेश निश्चितीच्या वेळी तसा अर्ज करावा. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, मुलाखत व वर्गातील सहभाग यांच्या आधारे १ ऑगस्ट २०२३ पूर्वी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांची यादी जाहीर केली जाईल. या विद्यार्थ्यांनी वर्ग सुरू होण्यापूर्वी रु. ३०,०००/- भरून नाव निश्चिती करणे आवश्यक आहे.

• **प्रवेश रद्द केल्यास शुल्क परतावा मिळणेबाबत**

१. **वर्ग सुरू होण्यापूर्वी प्रवेश रद्द केल्यास –** जमा शुल्काच्या २०% किंवा रु. ५,०००/- (यांपैकी जी रक्कम कमी असेल) वजा करून भरलेल्या शुल्कातील उर्वरित रक्कम परत केली जाईल.

२. **वर्ग सुरू झाल्यावर एक महिन्याच्या आत प्रवेश रद्द केल्यास –** जमा शुल्काच्या ४०% किंवा रु. १०,०००/- (यांपैकी जी रक्कम कमी असेल) + भरलेल्या शुल्कावरील GST ची रक्कम वजा करून उर्वरित रक्कम परत केली जाईल.

३. **वर्ग सुरू झाल्यावर एक महिन्यानंतर प्रवेश रद्द केल्यास शुल्क परत केले जाणार नाही.**